पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे - 17

ड प्रभाग समिती,

**कार्यपत्रिका क्र.8**

**सभावृत्तांत**

दिनांक 4/1/2013 वेळ दुपारी 12.00 वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार दि. 4/1/2013 रोजी दुपारी 12.00 वाजता ड प्रभाग कार्यालयाच्या सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस पुढीलप्रमाणे सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा.निता पाडाळे, | अध्यक्षा, |
| 2. | मा.प्रमोद ताम्हणकर | सदस्य |
| 3. | मा.विनोद नढे | सदस्य |
| 4. | मा.कैलास थोपटे | सदस्य |
| 5. | मा.अप्पा पवार | सदस्य |
| 6. | मा.विनय गायकवाड | सदस्य |
| 7. | मा.विलास नांदगुडे | सदस्य |
| 8. | मा.बापू उर्फ शत्रुघ्न काटे, | सदस्य |
| 9. | मा.राजेंद्ग जगताप | सदस्य |
| 10. | मा.नवनाथ जगताप | सदस्य |
| 11. | मा.अतुल शितोळे | सदस्य |
| 12. | मा.प्रशांत शितोळे | सदस्य. |
| 13. | मा.सुनिता वाघेरे | सदस्या |
| 14. | मा.विमल काळे | सदस्या |
| 15. | मा.अनिता तापकीर | सदस्या |
| 16. | मा.विमलताई जगताप | सदस्या |
| 17. | मा.झामाबाई बारणे | सदस्या |
| 18. | मा.स्वाती कलाटे | सदस्या |
| 19. | मा.आरती चोंधे | सदस्या |
| 20. | मा.शकुंतला धराडे | सदस्या |
| 21. | मा.शैलजा शितोळे | सदस्या |
| 22. | मा.सुषमा तनपुरे | सदस्या |
| 23. | मा.सोनाली जम | सदस्या. |

याशिवाय मा.अजित कारचे , प्रभाग अधिकारी, मा.व्ही.एम.इंगुळकर, प्रशासन अधिकारी सभा शाखा, मा.दांगट, कार्यकारी अभियंता, स्थापत्य, मा.के.जी.थोरात, कार्यकारी अभियंता विदयुत, मा.शरद जाधव, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा, मा.रामनाथ टकले, उपअभियंता, स्थापत्य, मा.जीवन गायकवाड, उपअभियंता स्थापत्य, मा.अनिल शिंदे, उपअभियंता, मा.एम.बी.सोनवणे, उपअभियंता, विदयुत, मा.दिलीप धुमाळ, उपअभियंता, विदयुत मा.अजय सुर्यवशी, उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.पाटील, उपअभियंता, मा. एस.डी.लगस, सहा.आरोग्याधिकारी,इत्यादी अधिकारी उपस्थित होते. सभेच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली. तदनंतर मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने व मा.नगरसदस्य यांचे मागणीप्रमाणे पुढीलप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेण्यात आले.

**विषय क्र.2 -** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 205 अन्वये नॉन डिपी रस्ता घोषित करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.आरतीताई चोधे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.3-** चौकांना व रस्त्यांना नांवे देणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.स्वाती कलाटे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.4 -** पिंपरी वाघेरे प्रभाग क्रमांक 45 येथे पी सी एम सी क्वॉर्टरस गीता निवासजवळ येथे मुतारी असून सदर मुतारीचा वापर होत नाही तसेच तेथील घाणीमुळे परिसरातील नागरीकांना दुर्गंधी तसेच इतर समस्यांना सामोरे जावे लागत आहे. सर्व नागरीकांची मुतारी हटवण्यासाठी मागणी आहे. तरी सदर मुतारी पाडण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.उषा वाघेरे पाटील यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.5 -** पिंपरीवाघेरे प्रभाग क्रमांक 44 मध्ये मोठया कमानी बांधणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.सुनिता वाघेरे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.6 -** डांगेचौक येथील बस स्टॉप, वाचनालय इत्यादी स्थलांतरीत करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.श्रीरंग बारणे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.7 -** नामकरण करण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.8 -** विदयुत खांब बदलणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव .

**विषय क्र.9 -** पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.10 -** नवीन बोअरवेल बसविण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

तदनंतर सर्व सन्मा.सदस्य यांनी प्रभाग समितीस मा.आयुक्त यांनी उपस्थित रहावे अशी सुचना करुन सदरची बैठक तहकुब करण्यात आली. यानंतर मा.अध्यक्षा यांनी आज रोजीची प्रभाग समितीची सभा तहकुब करणेत येत असल्याचे प्रकट केले.

सही/-
निता विलास पाडाळे
अध्यक्षा
ड प्रभाग समिती,पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी, पुणे ज्ञ 17

सही/-
प्रशासन अधिकारी सभा शाखा
ड प्रभाग समिती ,पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी, पुणे - 17

जा.क्र.ड/सभा/कावि/ 51 /2013
दिनांक 29 / 4 /2013
प्रति,
मा.श्री./श्रीमती -----------------------
सदस्य / सदस्या ड प्रभाग समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे - 17

ड प्रभाग समिती,

**कार्यपत्रिका क्र.8**

**(दिनांक 4/1/2013 रोजीची तहकुब सभा)**

**सभावृत्तांत**

दिनांक 8/2/2013 वेळ सकाळी 11.00 वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची मासिक तहकुब सभा शुक्रवार दि. 8/2/2013 रोजी सकाळी 11.00 वाजता ड प्रभाग कार्यालयाच्या सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस पुढीलप्रमाणे सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा.निता पाडाळे, | अध्यक्षा, |
| 2. | मा.प्रमोद ताम्हणकर | सदस्य |
| 3. | मा.कैलासभाऊ थोपटे | सदस्य |
| 4. | मा.अप्पा पवार | सदस्य |
| 5. | मा.निलेश बारणे | सदस्य |
| 6. | मा.श्रीरंग बारणे | सदस्य |
| 7. | मा.विलास नादगुडे | सदस्य |
| 8. | मा.बापू उर्फ शत्रुघ्न काटे | सदस्य |
| 9. | मा.रामदास बोकड | सदस्य |
| 10. | मा.राजेंद्ग जगताप | सदस्य |
| 11. | मा.नवनाथ जगताप | सदस्य |
| 12. | मा.प्रशांत शितोळे | सदस्य |
| 13. | मा.विमल काळे | सदस्या |
| 14. | मा.अनिता तापकीर | सदस्या |
| 15. | मा.विमलताई जगताप | सदस्या |
| 16. | मा.झामाबाई बारणे | सदस्या |
| 17. | मा.माया बारणे | सदस्या |
| 18. | मा.स्वाती कलाटे | सदस्या |
| 19. | मा.आरती चोधे | सदस्या |
| 20. | मा.शितल काटे | सदस्या |
| 21. | मा.वैशाली जवळकर | सदस्या |
| 22. | मा.शकुंतला धराडे | सदस्या |
| 23. | मा.शैलजा शितोळे | सदस्या |
| 24. | मा.सुषमा तनपुरे | सदस्या |
| 25. | मा.सोनाली जम | सदस्या |

याशिवाय मा.पी.एच.झुरे, प्रभाग अधिकारी, मा.व्ही.एम.इंगुळकर, प्रशासन अधिकारी सभा शाखा, मा.दांगट, कार्यकारी अभियंता, स्थापत्य, मा.के.जी.थोरात, कार्यकारी अभियंता विदयुत, मा.रामनाथ टकले, उपअभियंता, स्थापत्य, मा.जीवन गायकवाड, उपअभियंता स्थापत्य, मा.एम.बी.सोनवणे, उपअभियंता, विदयुत, मा.दिलीप धुमाळ, उपअभियंता, विदयुत मा.अजय सुर्यवशी, उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.राजेंद्ग जावळे, उपअभियंता पाणीपुरवठा विभाग, मा.अनिल राऊत, उपअभियंता जलनिसारण विभाग, मा.रत्नपारखी, उपअभियंता, स्थापत्य उदयान मा. एस.डी.लगस, सहा.आरोग्याधिकारी, मा.व्ही.एल.चव्हाण सहा.आरांग्याधिकारी इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

ठराव क्रमांक 58 विषय क्र.1
दिनांक 8/2/2013 विभाग ज्ञ नगररचना
सुचक - मा.स्वाती कलाटे अनुमोदक - मा.सुषमा तनपुरे

संदर्भ :- क्र.नरवि/कावि/ड-1/838/2012, दिनांक 12/12/2012 रोजीचा मा.आयुक्त साो. यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड शहराची विकास योजना सन 1995 मध्ये महाराष्ट्र शासन निर्णय क्र.टीपीएस-893/1276/सीआर-174/93/युडी-13, दिनांक 18 सप्टेंबर 1995 रोजी मंजूर झालेली आहे. त्यामध्ये मौजे-वाकड येथील स.नं.260 पै. मधील जमिन रहिवास विभाग व उर्वरित हरीत विभागात येत आहे तसेच स.नं. चा काही भाग मुळा नदीचे नदी ते निळी पुररेषा, निळी पुररेषा ते लाल पुररेषा व उर्वरित भाग लाल पुररेषेच्या बाहेर येत आहे.

मौजे-वाकड जगताप डेअरी ते बालेवाडी बाणेर या दोन्ही ठिकाणासाठी जोडणारा मुळा नदीवर पुल बांधल्यास वाहतुकीचा प्रश्न मार्गी लागेल त्याठिकाणी पुणे मनपा व पिंपरी चिंचवड मनपा यांचे संयुक्त विदयमाने पुल बाधणेत यावा अशी मागणी वरील संदर्भिय पत्रान्वये मा.आमदार श्री.लक्ष्मण जगताप यांनी केलेली आहे.

मा.आमदार यांचे पत्राचे अनुषंगाने मा.आयुक्त यांचे कार्यालयात दिनांक 13/9/2012 रोजी सयुंक्त बैठक आयोजित करणेत आलेली होती. त्यामध्ये झालेले चर्चेनुसार मौजे-वाकड येथील स.नं.260 पै. मध्ये स्मशानभूमिलगत पुलाचे स्थान निश्‍चित करुन वरील संदर्भ क्र.2 नुसार पुणे मनपाकडून नकाशे प्राप्त झालेले आहेत. सदरचे नकाशावर या विभागाने 30 मी. रुंदीचा रस्ता मार्क करुन दिनांक 5/10/2012 रोजी कार्यकारी अभियंता ड मुख्यालय स्थापत्य यांचेकडे नकाशे पाठविलेले होते. सदरचे नकाशाची तपासणी करुन वरील संदर्भिय पत्र क्र.3 अन्वये कार्यकारी अभियंता यांनी सदरचे रस्त्याची रुंदी 35 मी.करणेबाबत मागणी केलेली आहे.

तथापि सदर ठिकाणी मनपाचे मंजूर विकास योजनेत प्रस्तावित रस्ता दाखविलेला नाही त्यामुळे वाहतुकीचे नियोजनाचे दृष्टीने व पुणे मनपानेही त्यांचे हददीत रस्ता व पुल करण्याची तयारी दर्शविल्याने मौजे-वाकड येथील स.नं.260 पै. मध्ये मुळा नदीवरील नियोजित पुलाकरीता विकास योजनेव्यतिरिक्त मुळा नदीपासून 45.0 मी. रुंद रस्त्यापर्यंत 35.0 मी. रुंद रस्ता मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम 1949 चे कलम 205 अन्वये म्युनिसिपल रोड रस्ता घोषित करणे आवश्यक आहे.

सदरचा रस्ता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 205 अन्वये घोषित करणेकामी सदर प्रस्तावास मा.ड प्रभाग समितीची मंजुरी आवश्यक आहे. सबब प्रस्तुतच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक 59 विषय क्र.2
दिनांक 8/2/2013 विभाग - नगररचना
सुचक - मा.आरती चोंधे अनुमोदक - मा.शकुंतला धराडे

संदर्भ :- मा.आरतीताई चोंधे यांचा दिनांक 4/1/2013 रोजीचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ड प्रभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग क्रमांक 54 पिंपळे निलख प्रभागातील मौजे-वाकड येथील सर्व्हे नंबर 210 रहिवासी विभागातील मिळकत धारकांसाठी रस्त्याची आवश्यकता आहे. तरी पिंपरी चिंचवड मनपाच्या मंजूर आराखडयातील 45 मी.डी.पी.रोडपर्यंत मौजे-पिंपळेनिलख यथील सर्व्हे नंबर 27 मधून 12

मी.रुंद रस्ता हा मौजे-वाकड येथील सर्व्हे नंबर 210 मधून 45 मी. रस्त्यापर्यंत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 205 अन्वये 12 मी. नॉन डी.पी.रस्ता घोषित करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक 60 — विषय क्र.3
दिनांक 8/2/2013 — विभाग - स्थापत्य
सुचक - मा.स्वाती कलाटे — अनुमोदक - मा.शितल काटे

संदर्भ :- मा.स्वाती कलाटे यांचा दिनांक 4/1/2013 रोजीचा प्रस्ताव.

वॉर्ड क्रमांक 53 मधील चौकांना व रस्त्यांना सोबत जोडलेल्या नकाशाप्रमाणे नांवे देणेस व त्याचप्रमाणे बोर्ड लावण्याच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक 61 — विषय क्र.4
दिनांक 8/2/2013 — विभाग - स्थापत्य
सुचक - मा.सुषमा तनपुरे े — अनुमोदक - मा.विमल काळे

संदर्भ :- मा.उषा वाघेरे यांचा दिनांक 4/1/2013 रोजीचा प्रस्ताव.

पिंपरी वाघेरे प्रभाग क्रमांक 45 येथे पी सी एम सी क्वॉर्टरस गीता निवासजवळ येथे मुतारी असून सदर मुतारीचा वापर होत नाही तसेच तेथील घाणीमुळे परिसरातील नागरीकांना दुर्गंधी तसेच इतर समस्यांना सामोरे जावे लागत आहे. सर्व नागरीकांची मुतारी हटवण्यासाठी मागणी आहे. सबब सदर मुतारी पाडण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक 62 — विषय क्र.5
दिनांक 8/2/2013 — विभाग - स्थापत्य
सुचक - मा.सुनीता वाघेरे — अनुमोदक - मा.

संदर्भ :- मा.सुनीता वाघेरे यांचा दिनांक 4/1/2013 रोजीचा प्रस्ताव

पिंपरीवाघेरे प्रभाग क्रमांक 44 मध्ये डेअरी फार्म गणेश हॉटेल या ठिकाणी सिमेंट कॉव्हेटच्या भव्य कमानी बांधणेत यावेत तसेच पिंपरी कॅम्प साई चौकाच्या अलिकडे गुरुव्दारासमोर प्रेम प्रकाश मंदिर गल्ली येथे लोखंडी कमान बांधणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक 63 — विषय क्र.6
दिनांक 8/2/2013 — विभाग - स्थापत्य
सुचक - मा.अप्पा पवार — अनुमोदक - मा.प्रमोद ताम्हणकर

संदर्भ :- मा.श्रीरंग बारणे यांचा दिनांक 4/1/2013 रोजीचा प्रस्ताव

थेरगांव डांगे चौक येथे मनपा बस स्टॉप, वाचनालय, पासकेंद्ग इत्यादी बाबी आहेत. सध्या स्थितीत डांगे चौक येथे मनपाच्या वतीने पुलाचे काम चालु आहे. तसेच वरील विषयांकित बाबी श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळयाच्या समोर आहेत. तसेच डांगेचा ाकात मनपा बस स्ऑप असल्याने सतत गर्दीचे वातावरण असते. त्यामुळे डांगेचौकातील बस स्टॉप, वाचनालय, पासकेंद्ग डांगेचौकापासून 150 मी.अंतरावरती म्हणजेच मारुती मंदीराशेजारी स्थलांतरीत करण्यात यावे जेणेकरुन डांगेचौकातील वाहतुक सुरळीत होईल. सबब सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक 64 विषय क्र.7
दिनांक 8/2/2013 विभाग - स्थापत्य
सुचक - मा. सुषमा तनपुरे अनुमोदक - मा.शकुंतला धराडे

संदर्भ :- मा.सुषमा तनपुरे यांचा दिनांक 4/1/2013 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 59 मधुबन सांगवी येथील श्री संत गजानन महाराज मंदिरासमोरील स.नं.9 येथील पिण्याच्या पाण्याच्या टाकीला पिंपरी चिंचवड महानगरपालिका कै.ओंकार भाऊसाहेब ढोरे असे नामकरण करण्याच्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक 65 विषय क्र.8
दिनांक 8/2/2013 विभाग - विदयुत
सुचक - मा. सुषमा तनपुरे अनुमोदक - मा.शकुंतला धराडे

संदर्भ :- मा.सुषमा तनपुरे यांचा दिनांक 4/1/2013 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 59 मधुबन सांगवी येथील मधुबन सोसायटी गल्ली नं.1 ते 9 विदयुत विभागाकडील बसविलेले विदयुत खांब खुप दिवसापुर्वी बसविलेले असल्याने ते गंजलेल्या आवस्थेत आणि मोडकळीस आलेले आहेत. नागरीकांच्या सुरक्षा लक्षात घेऊन ते संपुर्ण विदयुत खांब बदलुन नवीन खांब बसविण्याच्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक 66 विषय क्र.9
दिनांक 8/2/2013 विभाग - पाणीपुरवठा
सुचक - मा. सुषमा तनपुरे अनुमोदक - मा.शकुंतला धराडे

संदर्भ :- मा.सुषमा तनपुरे यांचा दिनांक 4/1/2013 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 59 मधुबन सांगवी मधील मधुबन सोसायटी गल्ली नं.1 ते 9 भागात वाढणारी लोकसंख्या विचारात घेऊन त्याठिकाणी पाणीपुरवठा करणारी पाईप लाईन आहेत परंतु विरुध्द दिशेला पाईपलाईन नसल्यामुळे समोरील घरमालकांना नळकनेक्शन घेण्यासाठी समोरील रस्ता खोदावा लागतो तसेच दोन्ही बाजुचया घरांकरीता एकच पाईपलाईन असल्यामुळे पाणीपुरवठा कमी प्रमाणात होत आहे. रस्ता न खोदण्यासाठी व स्थापत्य विभागाचा खर्च कमी करण्यासाठी सदर ठिकाणी डबल नवीन पॅरलल लाईन टाकण्यासाठीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक 67 विषय क्र.10
दिनांक 8/2/2013 विभाग - पाणीपुरवठा
सुचक - मा. सुषमा तनपुरे अनुमोदक - मा.शकुंतला धराडे

संदर्भ :- मा.सुषमा तनपुरे यांचा दिनांक 4/1/2013 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 59 मधुबन सांगवी भागामध्ये बरेचसे बोअरवेल जुने व नादुरुस्त व बंद आवस्थेत आहेत. तरी ब-याच वेळा पाणीपुरवठयाचा प्रश्न ज्यावेळेस उपस्थित होतो त्यावेळेस पाण्याची टंचाई निर्माण होते. तरी नवीन बोअरवेल बसविण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा.अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे प्रकट केले.

सही/-
निता विलास पाडाळे
अध्यक्षा
ड प्रभाग समिती,पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी, पुणे ज्ञ 17

सही/-
प्रशासन अधिकारी सभा शाखा
ड प्रभाग समिती ,पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी, पुणे - 17

जा.क्र.ड/सभा/कावि/ 52/2013
दिनांक 29 /4/2013
प्रति,
मा.श्री./श्रीमती -----------------------
सदस्य / सदस्या ड प्रभाग समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका